**प्रेसनोट**

दि.०४/०६/२०२०

# सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ४, पुर्व विभाग - पुणे कार्यालयातील शाखा अभियंत्यावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई

---

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) विलास गोपाळराव तांभाळे, वय ५७ वर्षे, शाखा अभियंता, वर्ग-२, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ४, पुर्व विभाग अंतर्गत पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,००,०००/- (तीन लाख) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,५०,०००/- (अडीच लाख) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- १८/०३/२०२० <br> सापळा दिनांक :- ०४/०६/२०२० <br> यातील तक्रारदार यांनी त्यांना लाचेची मागणी केल्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार नोंदविली होती. <br> तक्रारदार यांना सार्वजनिक बांधकाम विभागाचे पुणे जिल्हयातील रस्त्याचे काम करण्याचे कंत्राट मिळाले होते. सदरचे काम तक्रारदार यांनी पुर्ण केले होते. सदर पुर्ण केलेल्या कामाचे ५० लाख रूपयाचे बिल सही करून मंजुरीकरीता पाठविण्यासाठी तक्रारदार यांचेकडे दिनांक १८/०३/२०२० रोजी ३,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली होती. <br> तडजोडीअंती आजरोजी २,५०,०००/- रूपये लाच रक्कम स्वीकारल्यावर ताब्यात घेण्यात आले असून बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचप त प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट.